**न्यायदंडाधिकारी ( प्रथम वर्ग ) यांचे ६७वे न्यायालय, बोरीवली, मुंबई**
**(पिठासीन अधिकारी — अभय दि. घुगे )**

**केस क्र.२५२/डिव्ही/२०२२**

श्रीमती. शमा परवीन अब्दुल्ला शेख .... अर्जदार

विरुध्द

श्री. अब्दुल्ला करीम शेख व इतर ४ .... प्रतिवादी

**आदेश नि.क्र. १**

**संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे कथने व प्रतिकथने मांडण्यात येत आहेत ती अशी**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचा घरगुती छळापासून संरक्षण कायदा २००५ कलम १७, १८, १९, २०, २२ आणि २३ अंतर्गत असलेल्या विविध उपकलमान्वये अंतरिम अनुतोष मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदारांनी तिचा घरगुती छळ केलेला आहे व तिला घरात मिळणा—या निवा—यापासून व तसेच आर्थिक मदतीपासून वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे ती स्वत:चे पालनपोषण करण्यांस असमर्थ आहे. त्यामुळे तिला सध्याच्या परिस्थितीत हालाखीत जगावे लागत आहे.

३. अर्जदार हिने असे कथीत केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा तिचा पती आहे. गैरअर्जदार क्र.२ हे सासरे, गैरअर्जदार क्र.३ हि सासू, गैरअर्जदार क्र.४ ही ननंद, गैरअर्जदार क्र.५ हे तीचे दिर आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा निकाह दिनांक ०१.०६.२०२० रोजी झाला असुन त्यांना आयत नावाची एक मुलगी आहे. गैरअर्जदार क्र.१ यांचा भंगारचा धंदा

असून ते गाडी चालवितात त्यातुन त्यांना महिन्याला अंदाजे ४०,००० ते ५०,००० रुपये मिळतात. गैरअर्जदार हे अर्जदार यांना शीवीगाळ करीत असत तसेच ति गरोदर असताना तिला मुल पाडावयास जबरदस्ती केली तसेच गरोदर असून देखील मारहाण केली.

४. अर्जदार हीने उत्पन्न—खर्चाच्या प्रतिज्ञापत्रात ती बारावी पास असुन तिचे मासिक उत्पन्न काहीही नसल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार हा दहावी पास असुन एका कंपनीमध्ये चालक म्हणून काम करतो त्यातून त्याला दरमहा रु. २०,०००/— मिळतात. अर्जदार हीने तिच्यासाठी व मुलीसाठी एकुण दरमहा रुपये २०,०००/— अंतरिम अनुतोष मिळण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदाराने त्याचे उत्पन्न —खर्चाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. तसेच त्यांना संधी असुन देखील मुळ अर्जास अथवा अंतरीम अर्जास उत्तर/म्हणणे दाखल केलेले नाही.

५. अर्जदार व गैरअर्जदार यानी दाखल केलेल्या कथना व प्रतिकथनावरुन पुढील मुददे विचारार्थ उपस्थित होतात, ज्यावर खालील नमुद कारणान्वये निष्कर्ष नोंदविण्यांत येतो.

| **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अर्जदार हि सकृतदर्शनी असे शाबित करते की ती विनंती मागणी केलेल्या अनुतोषास पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी अंतरिम पोटगीस पात्र |
| २. आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

६. अर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील दाखल प्रतिकथनाचे व कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

७.  प्रस्तुत प्रकरणांत गैरअर्जदारांनी अर्जदाराबरोबर असलेले नातेसंबंध नाकारलेले नाही. अर्जदाराने जरी इतर बाबींबाबत व प्रतिबंधात्मक आदेशाबाबतची मागणी केलेली असली तरी याबाबतीत सदयप्रकरणांतील परिस्थिती पाहता तसा आदेश देणे उचित होणार नाही. अर्जदार हिने तिच्यासाठी व स्वतःच्या मुलीसाठी अंतरिम पोटगीबाबत एकुण रक्कम दरमहा रुपये २०,०००/— मागितली आहे. अर्जदार हिने केलेली मागणी अवाजवी व अवास्तव आहे व वस्तुस्थितीशी धरुन नाही तसेच उत्पन्नाचा उचित असा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. एकंदरीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान तसेच आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेता व उत्पनाच्या शपथपत्रातील बाबी विचारार्थ घेता अर्जदारास रुपये ३,०००/— (तीन हजार) दरमहा व मुलीसाठी रुपये ३,०००/— (तीन हजार) दरमहा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून घेण्यांस पात्र होतात हा निष्कर्ष नोंदविण्यांस कोणतीही अडचण नाही. सबब, मुददा क्र. १ वरील निष्कर्ष अशंतः होकारार्थी नोंदवून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेः—

## आदेश

१. गैरअर्जदार क्र.१ हयांनी अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून ते मूळ अर्ज निकाली निघेपर्यंत अर्जदारास रुपये ३,०००/— (तीन हजार रुपये) व अर्जदाराच्या मुलीसाठी रुपये ३,०००/— (तीन हजार रुपये)असे एकूण रुपये ६,०००/— (सहा हजार रुपये) दरमहा देण्यांत यावे.

२. या आदेशाची प्रत पक्षकारांस विनामुल्य देण्यांत यावी.

३. खर्चाविषयी आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यांत आला)

ABHAY DINKARRAO GHUGE
Digitally signed by ABHAY DINKARRAO GHUGE
Date: 2024.10.21 12:15:01 +0530

दिनांक — ०१/१०/२०२४

(अभय दि. घुगे)
न्यायदंडाधिकारी(प्रथम वर्ग),
६७ वे न्यायालय, बोरीवली,मुंबई

टंकलिखीत केले — ०१/१०/२०२४
स्वाक्षरी केली — ०१/१०/२०२४